मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी–चिंचवड | शनिवार, दि. 13 जुलै 2024 | पान- 1

# शहराला मिळाला पाचवा आमदार!

## अमित गोरखे विधानपरिषद निवडणुकीत विजयी : पेपर विक्रेता ते विधान परिषद आमदार खडतर प्रवास

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधान परिषदेच्या निवडणुकीत शुक्रवारी पिंपरी-चिंचवड शहराला पाचवा आमदार मिळाला आहे. भाजपचे राज्य सचिव अमित गोरखे हे विजयी झाले आहेत. गोरखे यांच्या रूपाने भाजपला चौथा आमदार मिळणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी निष्ठावान असण्याचा फायदा गोरखे यांना झाला आहे. भाजप नेतृत्वाने मातंग समाजाला प्रतिनिधित्व देत 'सोशल इंजिनिअरिंग' साधले आहे.

शुक्रवारी (दि. १२) रोजी मतदान पार पडले. दुपारी पावणेचारच्या सुमारास १०० टक्के मतदान पूर्ण झाले. साधारण सायंकाळी पाचनंतर प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात झाली. मतमोजणीसाठी २५-२५ मतांचे दहा गठ्ठे आणि एक गठ्ठा २४ मतांचा करण्यात आला होता. सुरुवातीला पहिल्या पसंतीच्या मतांची मोजणी पार पडली. एकूण २७४ आमदारांनी मतदान केले होते. समान पसंती दिल्याने पैकी एक मत बाद झाले. भाजप ५, शिवसेना शिंदे गट २, राष्ट्रवादी अजित पवार गट २, शेतकरी कामगार पक्ष १, काँग्रेस १ व उबाठा शिवसेना १ असे १२ उमेदवार रिंगणात होते.



### गटातटाचा फटका पिंपरीला बसत होता

» महापालिकेची सूत्रे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि नंतर आ. महेश लांडगे यांच्याकडे गेली. त्यामुळे भाजपच्या इतर नेतृत्वाला संधी मिळत नव्हती. पिंपरी मतदारसंघ अनुसूचित जाती गटासाठी राखीव असून राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या सामन्यात भाजपला मुसंडी मारता येत नव्हती. पक्षाकडे तशा तक्रारी केल्या जात होत्या. या दोन नेत्यांच्या गटातटाचा फटका पिंपरीला बसत होता.

पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी, चिंचवड आणि भोसरी असे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. चिंचवडमधून भाजपच्या अश्विनी जगताप, भोसरीमधून महेश लांडगे विधानसभेचे आमदार आहेत, तर भाजपच्याच उमा खापरे विधान परिषदेच्या आमदार आहेत. पिंपरीतून राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे अण्णा बनसोडे विधानसभेवर निवडून गेले आहेत.

दरम्यान, २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी पिंपरी-चिंचवड शहरातील गोरखे यांची नियुक्ती केली होती. त्यानंतर २०१९ मध्ये राज्यात सत्तांतर झाले. त्यामुळे सर्व महामंडळे बरखास्त झाली. नंतर २०२२ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार जाऊन महायुतीचे सरकार आले. त्यावेळी महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेत्या उमा खापरे यांना विधान परिषदेवर संधी देण्यात आली. त्यानंतर विधान परिषदेसाठी भाजपने गोरखे यांना संधी दिली होती. मतदान आणि मोजणी झाली.

भाजपचे पाच उमेदवार असल्याने तसेच ११ जागांसाठी एकूण बारा उमेदवार होते. त्यामुळे कोणाची वर्णी लागणार आणि कोणाचा पत्ता कट होणार याची उत्सुकता होती. चर्चा रंगली होती. निवडणुकीत महायुतीचे सर्व उमेदवार निवडून आले आहेत. सायंकाळी पिंपरीमध्ये विजयोत्सव साजरा करण्यात आला. तर शहरात विविध भागात विजयाचे फ्लेक्स लागले होते.

### राजकीय प्रवास

» **शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कामे करत असताना आई अनुराधा गोरखे यांना महापालिकेत नगरसेविका म्हणून निवडून आल्यानंतर आईच्या बरोबरीने शहराच्या विकासात योगदान देत ते निष्ठेने काम करत राहिले. 2012 मध्ये भाजपा नेते देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून भारतीय जनता पक्षात प्रदेश सदस्य ते प्रदेश सचिव असा प्रवास करताना त्यांची सा अण्णाभाऊ साठे महामंडळावर अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली. अटलबिहारी वाजपेयी, स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, यशवंतराव चव्हाण हे त्यांचे राजकिय क्षेत्रातील आदर्श आहेत. देवेंद्र फडणवीसांना ते गुरुस्थानी मानतात नुकतीच संपूर्ण महाराष्ट्रातून विधानपरिषदेसाठी त्यांची सदस्य म्हणून निवड भाजपाने करून त्यांच्यावर मोठी जबाबदारी दिलेली आहे मातंग समाजाच्या इतिहासातील विधान परिषदेवर जाणारे ते पहिले युवा आमदार ठरले आहेत..**

# साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व दिमाखात साजरा होणार

## भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने मातंग समाजाच्या शिष्टमंडळाने घेतली आयुक्तांची भेट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व साजरा करण्याच्या अनुषंगाने भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी शहरातील मातंग समाजाच्या शिष्टमंडळासह महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची शनिवारी भेट घेतली. विचार प्रबोधन पर्वच्या नियोजनाबाबत महापालिका प्रशासनाने तातडीने बैठक घ्यावी आणि निधीमध्ये वाढ करावी, साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात दिमाखात साजरी करण्यात यावी, त्यांच्या विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महापालिकेने कुठेही कमी पडू नये, अशा मागण्या आयुक्तांकडे करण्यात आल्या. आयुक्तांनी मातंग समाज शिष्टमंडळाच्या सर्व मागण्या या भेटीत मान्य केल्याने यंदाचा जयंती उत्सव सोहळा दिमाखात साजरा होणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्वचे आयोजन केले जाते. त्याअंतर्गत निगडीसह शहराच्या इतर भागात विविध समाजोपयोगी कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येतात. साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व २०२४ चे आयोजन केले जात असताना त्यासंदर्भात शहरातील मातंग समाजाच्या वतीने काही मागण्या पुढे आल्या आहेत. त्यानुसार या समाजाच्या शिष्टमंडळाने भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेत चर्चा केली. यावेळी मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब अडागळे, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मनोज तोरडमल, साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्वचे नवनिर्वाचित अध्यक्ष नितीन घोलप, माजी अध्यक्ष नाना कसबे, सुनील भिसे, संजय ससाणे, अरूण जोगदंड, बाळासाहेब पाटोळे, रामेश्वर बावणे, नाना कांबळे, मोहन भिसे आदी उपस्थित होते.



साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व २०२४ संदर्भात महापालिका प्रशासनाने शहरातील मातंग समाजाला व या समाजातील प्रमुख नेत्यांना विश्वासात घेऊन नियोजन करावे, नियोजनाची बैठक तातडीने आयोजित करण्यात यावी, विचार प्रबोधन पर्वसाठीच्या निधीमध्ये तातडीने वाढ करण्याचे निर्देश प्रशासनाला द्यावेत तसेच साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महापालिकेने कुठेही कमी पडू नये तसेच इतर राष्ट्र पुरूषांप्रमाणेच साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात दिमाखात साजरी करण्यात यावी, अशा मागण्या भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केल्या. आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या थाटामाटात साजरी व्हावी, यासह सर्व मागण्या मान्य केल्याने मातंग समाजाच्या शिष्टमंडळाने या भेटीत समाधान व्यक्त केले. तसेच या मागण्यांसाठी भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पुढाकार घेतल्याबद्दल सकल मातंग समाजाच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

# गुलाबी ई-रिक्षासाठी 20 टक्के अनुदान

## पुणे, पिंपरी-चिंचवडमधील 2 हजार महिला ठरणार लाभार्थी पुण्यात 141 गुलाबी रिक्षा धावताहेत

**पुणे | प्रतिनिधी**

महिलांना रोजगार मिळून स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, याकरिता शासनाकडून गुलाबी ई-रिक्षा खरेदीवर २० टक्के अनुदान मिळणार आहे. राज्यात १० हजार, पुण्यात जवळपास १४००, पिंपरी ३००, चिंचवडमध्ये ३०० अशा एकूण २ हजार महिलांना गुलाबी ई-रिक्षा खरेदीसाठी अनुदान देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यामुळे बेरोजगार महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

या योजनेचा लाभ हा दहा प्रमुख शहरांमध्ये दिला जाणार आहे . या योजनेअंतर्गत पहिल्या वर्षासाठी 5000 गुलाबी रिक्षा दिले जाणार आहे. आणि याचा लाभ हा बेरोजगार महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी सरकार 20% (SUBSIDY ) अनुदान देईल, आणि अर्जदार महिलेला 10% खर्च महिलेला करावा लागेल. तर उर्वरित 70 % बँक कर्जाद्वारे कव्हर केले जाईल. तर या योजनेचा लाभ कोणाला दिला जाईल, यात पात्रता कोण असेल, फायदे काय आहेत,

२०१६ मध्ये महिलांसाठी गुलाबी रिक्षा म्हणजेच अबोली रिक्षा योजना सुरू झाली. पुण्यात आतापर्यंत इंधनावरील १४१ रिक्षांची खरेदी झाली, त्याद्वारे प्रवासी सेवा पुरवली जात आहे. २०१६ ते २०२४ या नऊ वर्षांच्या कालावधीत या गुलाबी रिक्षाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. मात्र, शासनाकडून जाहीर केलेल्या या अनुदानामुळे (सबसिडी) आगामी काळात पुण्यात गुलाबी रिक्षांची संख्या नक्कीच वाढेल, अन् तिही ईलेक्ट्रिकवरीलच, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### गुलाबी रिक्षा परवान्यासाठी आवश्यक कागदपत्रे

- रिक्षा लायसन्स आणि बॅच आवश्यक ऑनलाईन अर्ज करावा.
- पहिली ऑनलाईन फी ५०० रूपये आणि दुसऱ्यांदा १० हजार रुपये
- रहिवासी दाखला, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र हवे
- पत्याचे पुरावे आवश्यक
- महिला रिक्षाचालकांसाठी गुलाबी रंगाची रिक्षा घेण्याची अट
- परवाना दिल्यावर नवीन रिक्षा घेण्याची अट

### अनुदानासाठी काय लागेल?

- योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज
- लाभार्थ्यांचे आधारकार्ड, पॅनकार्ड
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र
- कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न ३ लाखांपेक्षा कमी)
- बँक खाते पासबुक पासपोर्ट आकाराचे फोटो,
- मतदान ओळखपत्र रेशनकार्ड, चालक परवाना,
- रिक्षा महिलाच चालवणार असल्याचे हमीपत्र
- योजनेच्या अटीशर्तीचे पालन करणार असल्याचे हमीपत्र

### अनुदान योजनेसाठीची पात्रता

- लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक राहील.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम ३ लाखापेक्षा जास्त नसावे.
- अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षे दरम्यान असणे अनिवार्य आहे.
- लाभार्थ्यांकडे वाहन चालक परवाना असणे आवश्यक राहील.
- विधवा, कायद्याने घटस्फोटीत, राज्यगृहामधील इच्छुक प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्र प्राप्त युवती, अनुरक्षणगृह/बालगृहातील आजी / माजी प्रवेशित यांना प्राधान्य देण्यात येईल.
- तसेच दारिद्र्यरेषेखालील महिलांनासुद्धा प्राधान्य देण्यात येईल.

# पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलचे काउंटडाऊन सुरू!

## नव्या टर्मिनलच्या व्यवस्थेचा आणि सज्जतेचा केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आढावा घेतला

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विमानतळाचे नवीन टर्मिनल येत्या रविवार पासून (१४ जुलै) प्रवाशांसाठी खुले होणार आहे. नवे टर्मिनल कार्यान्वित करताना नव्या टर्मिनलच्या पहिल्या प्रवाशाला दुपारी १ वाजता बोर्डिंग पास देण्यात येणार आहे अशी माहिती नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

पुणे विमानतळाचे नवे टर्मिनल उद्घाटनानंतर तब्बल चार महिने कार्यान्वित होण्याच्या प्रतीक्षेत आहे. या नव्या टर्मिनलच्या व्यवस्थेचा आणि सज्जतेचा केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आढावा घेतला. येत्या रविवारी हे नवे टर्मिनल कार्यान्वित होत असून, हे टर्मिनल पुण्याच्या विकासाचे साक्षीदार आहे, अशी प्रतिक्रिया मोहोळ यांनी पाहणीनंतर व्यक्त केली.

पुणे विमानतळावरील नवे टर्मिनल सुरू करण्यासाठी मंत्री मोहोळ यांनी पाठपुरावा केला होता. या टर्मिनलवर बंदोबस्तासाठी आवश्यक असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या अतिरिक्त जवानांचा प्रश्न मोहोळ यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन सोडवला होता. तसेच इतर तांत्रिक प्रक्रियाही पूर्ण करून घेतल्या. त्यामुळे नवे टर्मिनल कार्यान्वित होण्याचा मार्ग मोकळा झाला. पाहणीसाठी मोहोळ यांच्यासमवेत पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांच्यासह विमानतळाच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या माध्यमातून मोठा निधी गेल्या दहा वर्षांत पुणे शहराला मिळाला आहे. नवे टर्मिनल हे पुण्याच्या विकासाचे साक्षीदार असून, पुणे शहरातील हे विकासपर्व पुढेही निरंतर सुरू राहील, असे मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.



### पदभार स्वीकारल्यानंतर कामाला गती

पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ मार्चला झाले होते. परंतु सीआयएसएफच्या जवानांच्या पूर्ततेच्या अभावी नवीन टर्मिनल सुरू होण्यास विलंब होत होता. मात्र मुरलीधर मोहोळ यांनी हवाई मंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर कामाला गती आली. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन टर्मिनलसाठी 'सीआयएसएफ'ची नियुक्ती झाली. तसेच इतर तांत्रिक प्रक्रियाही पूर्णत्वास जात आहे. येत्या रविवारी म्हणजेच १४ जुलै रोजी हे नवे टर्मिनल सुरु होईल. नवे टर्मिनल कार्यान्वित करताना नव्या टर्मिनलच्या पहिल्या प्रवाशाला दुपारी १ वाजता बोर्डिंग पास देण्यात येणार आहे, असे मोहोळ यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर सांगितले आहे

# महापालिकेने केली 106 जणांची निवड रद्द

## विहित मुदतीत रुजू न झाल्याने लिपिक, कनिष्ठ अभियंता, साहाय्यक अभियंता पदावरील उमेदवारांची निवड रद्द

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका आस्थापनेवरील लिपिक, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिक साहाय्यक आणि कनिष्ठ विद्युत अभियंता या पदावर अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची यादी तयार केली होती. मात्र, संबंधित उमेदवारांनी पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल, शारीरिक पात्रता तपासणी सादर केला नाही. प्रशासनाने वारंवार पत्रव्यवहार, ई मेल करूनही त्यांनी कोणताही संपर्क केला नाही. ते उमेदवार विहित मुदतीत रुजू झाले नाहीत. त्यामुळे त्या उमेदवारांना नोकरीची आवश्यकता नाही, असे दिसून आल्याने महापालिकेने तब्बल १०६ उमेदवारांची निवड रद्द केली आहे.




पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने आस्थापनेवरील विविध ११ पदांच्या ३६२ जागांसाठी नोकर भरती राबवली होती. त्यापैकी आतापर्यंत एकूण २५६ कर्मचारी रुजू झाले आहेत. त्यांना प्रशिक्षण देऊन विविध विभागांत नेमणुका देण्यात आल्या आहेत. मात्र, त्यापैकी १३ कर्मचाऱ्यांनी दोन महिन्यांतच आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे राजीनामा सादर केला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका राज्यात 'श्रीमंत महापालिका' म्हणून ओळखली जाते. शहराची स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. विविध नावीन्यपूर्ण व नवनवीन संकल्पना महापालिकेकडून राबवल्या जात आहेत, मोठे-मोठे खर्चिक प्रकल्प महापालिकेकडून राबवले जातात. त्यामुळे राज्यभरातील अधिकारी महापालिकेत काम करायची संधी मिळावी म्हणून प्रयत्नशील असतात. परंतु, महापालिकेच्या आस्थापनेवरील लिपिक, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी साहाय्यक, कनिष्ठ अभियंता विद्युत यासह विविध पदांची भरती घेण्यात आली होती. यामध्ये सामान्य प्रशासनाने गुणवत्ताधारक उमेदवारांची अंतिम निवड व प्रतीक्षा यादी प्रसिध्द केली होती.

अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना महापालिकेकडून पूर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी, शारीरिक पात्रता तपासणी करून घेण्यासाठी आवश्यक फार्म भरून सामान्य प्रशासन विभागात उपस्थित राहण्यास सांगितले होते. काही उमेदवार हे अद्याप उपस्थित राहिले नाहीत. तसेच अनेक उमेदवार फॉर्म घेऊन गेले. पण, पूर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी अहवाल, शारीरिक पात्रता तपासणी अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केला नाही. काही उमेदवारांना वारंवार ई मेल, पत्रव्यवहार करण्यात आला. स्मरणपत्रे पाठवण्यात आली. त्यांना मुदतवाढदेखील देण्यात आली. तरीही कित्येक उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभागाकडून संपर्क केला नाही. याशिवाय काही उमेदवारांनी पूर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी, शारीरिक पात्रता तपासणी अहवाल सादर केला. पण, महापालिकेने दिलेल्या विहित मुदतीत ते अद्याप रुजू झालेले नाहीत. त्या उमेदवारांनी रुजू होण्यासाठी प्रशासनाकडे ई मेल, पत्र व्यवहार केलेला नाही.

सामान्य प्रशासनाकडे काही उमेदवारांनी खुला सर्वसाधारण, खुला (खेळाडू) प्रवर्गातून महापालिकेत रुजू झाले आहेत. त्या नावासमोर नमूद ईडब्ल्यूएस सर्वसाधारण, ईडब्ल्यूएस संवर्गातील नेमणूक रद्द करण्याची विनंती केली होती. दरम्यान, उमेदवारांनी विविध पदावरील रुजू होण्याकामी कोणत्याही प्रकारचा ई मेल, पत्रव्यवहार सामान्य प्रशासनाशी केलेला नाही. त्या अर्थी त्यांना नोकरीची आवश्यकता नाही, असे दिसून येत आहे. त्यामुळे महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून लिपिक, कनिष्ठ अभियंता, साहाय्यक अभियंता या पदावर उमेदवारांची अंतिम निवड रद्द करण्यात आलेली आहे.

### राजीनामासत्र सुरुच

» **महापालिका आस्थापनेवरील विविध पदावर काम करणाऱ्या उमेदवारांची अन्य ठिकाणी निवड झाल्याने नव्याने रुजू झालेले कर्मचारी राजीनामा देत आहेत. यामध्ये चार लिपिक, एक कनिष्ठ अभियंता, आठ स्थापत्य अभियांत्रिकी साहाय्यक अशा एकूण १३ जणांनी राजीनामे दिले आहेत. तसेच आणखी काही कर्मचाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. त्यांचे राजीनामे अद्याप मंजूर झालेले नाहीत. त्यामुळे महापालिकेची नोकरी सोडून देणाऱ्यांचे प्रमाणही वाढत आहे.**

> उमेदवारांना हे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. उमेदवारांनी वेगवेगळ्या विभागातील पदासाठी परीक्षा दिल्या. निकाल लागल्यानंतर ते महापालिकेत रुजू झाले. त्यानंतर इतर विभागांचा निकाल लागला. त्यातही निवड झाल्याने आणि अधिक वेतन, इतर सुविधा असल्याने रुजू झालेल्या काही कर्मचाऱ्यांनी राजीनामा दिला आहे, तर निवड होऊनही अद्याप रुजू न झालेल्या उमेदवारांची अंतिम निवड रद्द केलेली आहे.
>
> **- विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन, महापालिका.**

# इंद्रायणी पुनरुज्जीवन प्रकल्पाला मिळणार गती

## तांत्रिक मान्यता शुल्क भरण्यास आयुक्तांची मान्यता : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या हद्दीतून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी महापालिकेकडून इंद्रायणी नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबवण्यात येणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार ५२६ कोटी एवढा निधी अपेक्षित आहे.

नदी पुनरूज्जीवन प्रकल्पासाठी महापालिकेने ४२६ कोटी ६६ लाख एवढ्या निविदा रक्कमेस जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता घेण्यात येणार आहे. त्यासाठी निविदा रक्कमेच्या ०.५० टक्के दराने २ कोटी १३ लाख ३३ हजार ३२३ एवढे तांत्रिक मान्यता शुल्क महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभागाकडे जमा करण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समिती सभेत मान्यता दिली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत सुमारे २०.६० किमी इंद्रायणीचे पात्र वाहते. इंद्रायणी नदीच्या दक्षिणेकडील बाजूस पीएमआरडीएची हद्द आहे. इंद्रायणी नदीच्या पात्रामध्ये मोठ्या प्रमाणात सांडपाणी, घनकचरा, तसेच नदीच्या दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणात अनधिकृत राडारोडा, भराव, अनधिकृत बांधकामे होत असल्याने नदीने मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे.



पीएमआरडीएच्या हद्दीमध्ये दिवसेंदिवस होणारे नागरिकरण तसेच औद्योगिकीकरणामुळे नदीच्या पाण्याची गुणवत्ता खालावत असून पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे. नदीच्या उगमाकडील गावे तसेच नगरपंचायती व नगरपरिषदा यांच्या कार्यक्षेत्रातून सांडपाणी नदीत मिसळत असल्याचे पाणी तपासणी अहवालात निदर्शनास आले आहे. त्यामुळे नदीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारणे, तसेच नदीमध्ये असणारी जैवविविधता जोपासण्याकरिता तसेच आळंदी परिसरात नदीचे पावित्र्य राखण्यासाठी इंद्रायणी नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार इंद्रायणी नदी पुनरूज्जीवन प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्याची अंदाजपत्रकीय रक्कम ५२६ कोटी ५ लाख ८२ हजार ८९८ एवढी आहे. इंद्रायणी नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबविण्यासाठी शासनाच्या अमृत २.० योजनेंतर्गत प्राप्त निधीतून केल्या जाणा-या नियोजित कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे देण्यात आलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंदाजपत्रकाची छाननी केली जाणार आहे.

### राज्य 25, केंद्र 25 तर पालिका 50 टक्के खर्च करणार

» **महापालिकेला तांत्रिक मान्यतेपोटी निविदा रकमेच्या ०.५० टक्के दराने तांत्रिक मान्यता शूल्क भरणे आवश्यक आहे. त्यामुळे मूळ प्रकल्पाच्या ४२६ कोटी ६६ लाख ६४ हजार ५५९ एवढ्या निविदा रक्कमेस तांत्रिक मान्यतेकामी ०.५० टक्के दराने येणारा खर्च २ कोटी १३ लाख ३३ हजार ३०० एवढा आहे. या रक्कमेचा धनादेश किंवा धनाकर्षक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग पुणे यांच्या नावे भरावा लागणार आहे. ही प्रक्रिया राबविण्यासाठी स्थायी समिती सभेत आयुक्तांनी आज मान्यता दिली. त्यामुळे इंद्रायणी नदी पुनरूज्जीवन प्रकल्पाला चालणा मिळणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्र शासन २५ टक्के, राज्य शासन २५ टक्के आणि महापालिका ५० टक्के निधी खर्च करणार आहे.**

# पुणे जिल्ह्यात 49 शाळा अनधिकृत

## प्रत्यक्षात महापालिका हद्दीत लाखांपेक्षा अधिक पाळीव श्वान, अँटी रेबिज, नसबंदीचा अभाव

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, पिंपरी-चिंचवड, जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अनधिकृत शाळांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षण विभागाने पुणे, पिंपरी चिंचवड आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील मिळून ४९ शाळा अनधिकृत असल्याचे जाहीर केले आहे.




गेल्या काही वर्षांत अनधिकृत शाळांचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनधिकृत शाळांची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. गेल्या वर्षी राज्यभरात ६६१ शाळा अनधिकृत असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी विधीमंडळात दिली होती. त्यानंतर अनधिकृत शाळांवर शिक्षण विभागाकडून कारवाई सुरू करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर अनधिकृत शाळांचा शोध घेण्यासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे प्रशासकीय अधिकारी, जिल्ह्यातील सर्व गट शिक्षणाधिकाऱ्यांनी संयुक्त मोहीम राबविली होती. या मोहिमेत अनधिकृत आढळून आलेल्या शाळांची यादी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, माध्यमिक शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर यांनी जाहीर केली.

आरटीई कायद्यातील कलम १०नुसार शासन किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यता, ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय शाळा सुरू करता येत नाही. शासन, स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय शाळा चालवण्यात येत असल्यास किंवा शाळेची मान्यता काढून घेतल्यानंतरही शाळा चालवण्यात येत असल्यास संबंधितांना एक लाख रुपयांपर्यंत दंड, त्यानंतरही शाळा अनधिकृतरित्या सुरू राहिल्यास दररोज १० हजार रुपये दंड आकारण्याची तरतूद आहे. शासन परवानगी, मान्यता प्रमाणपत्राशिवाय अनधिकृतपणे सुरू असणाऱ्या शाळांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व पंचायत समित्यांचे गटशिक्षणाधिकारी, पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनधिकृत शाळा बंद होतील, कार्यक्षेत्रात अनधिकृत शाळा सुरू राहणार नाहीत, याची दक्षता घेण्याबाबत कळवण्यात आल्याचे नमूद करण्यात आले.

### अनधिकृत शाळा पुढीलप्रमाणे

» किड्जी स्कूल दौंड, जिजाऊ एज्युकेशन सोसायटीचे अभंग शिशू विकास कासुर्डी, ऑर्किड इंटरनॅशनल स्कूल उंड्री, नारायण ई टेक्नो स्कूल वाघोली, द गोल्डन इरा इंग्लिश मीडियम स्कूल हवेली, फ्लोरिंग फ्लोरा इंग्लिश मीडियम स्कूल मांजरी बु., इ. एम. एच. इंग्लिश मीडियम स्कूल फुरसुंगी, व्हीटीईएल इंग्लिश मीडियम स्कूल भेकराईनगर, द टायगर इज इंटरनॅशनल स्कूल कदमवाकवस्ती, रामदास सिटी स्कूल रामदरा, मारीगोल्ड इंटरनॅशनल स्कूल कदमवाकवस्ती, श्रीमती सुलोचनाबाई झेंडे बालविकास मंदिर व प्राथमिक विद्यालय कुंजीरवाडी, शिवसमर्थ इंग्लिश मीडियम स्कूल जांभुळवाडी, भैरवनाथ इंग्लिश मीडियम स्कूल मोई, जिजस क्राइस्ट इंग्लिश मीडियम स्कूल कामशेत, श्रेयान इंटरनॅशनल स्कूल गहुंजे, व्यंकेश्वरा वर्ल्ड स्कूल नायगाव, किंग्ज वे पब्लिक स्कूल रायवूड लोणावळा, रुडिमेन्ट इंटरनॅशनल स्कूल माण, एंजल इंग्लिश मीडियम स्कूल नेरे, चाणक्य कनिष्ठ महाविद्यालय पिरंगुट, महिंद्रा युनायटेड इंटरनॅशनल स्कूल खुबवली, अंकुर इंग्लिश मीडियम स्कूल मुळशी, पेरिविंकल इंग्लिश मीडियम स्कूल पिरंगुट, ईलाइट इंटरनॅशनल स्कूल मुळशी, संस्कार प्रायमरी स्कूल इंग्लिश मीडियम मुळशी, श्री विद्या भवन इंग्लिश मीडियम स्कूल घोटावडे फाटा, पोदार इंटरनॅशनल स्कूल ताथवडे, एलप्रो इंटरनॅशनल स्कूल हिंजवडी, माऊंट कासल इंग्लिश मीडियम स्कूल नेरे, सरस्वती विद्या मंदिर पिरंगुट, श्रीनाथ इंग्लिश मीडियम स्कूल वीर, तकवा इस्लामिक स्कूल अँड मक्तब कोंढवा, लेगसी हायस्कूल कोंढवा, इमॅन्युअल पब्लिक स्कूल हडपसर, पिपल ट्री एज्युकेशन ट्रस्ट पिंपळे निलख, श्री चैतन्य इंग्लिश मीडियम स्कूल पिंपळे निलख, आयडियल इंग्लिश स्कूल पिंपळे गुरव, सपलिंग्स इंग्लिश मीडियम स्कूल चिंचवडेनगर, लिटिल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल चिंचवडेनगर, नवजित विद्यालय वाल्हेकरवाडी, किड्सजी स्कूल पिंपळे सौदागर, एम. एस. स्कूल फॉर किड्स सांगवी, क्रिस्टल मॉर्डन स्कूल चऱ्होली, माऊंट एव्हरेस्ट इंग्लिश स्कूल कासारवाडी, ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल चिंचवड.

# पुणे शहरात झिकाचा धोका वाढला!

## शहरातील झिकाची एकूण रुग्णसंख्या 18 वर पोहोचली असून, त्यातील 10 गर्भवती

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात झिकाचा धोका वाढला असून, आणखी दोन गर्भवतींना संसर्ग झाल्याचे गुरुवारी समोर आले. यामुळे शहरातील झिकाची एकूण रुग्णसंख्या १८ वर पोहोचली असून, त्यातील १० गर्भवती आहेत. झिकाचा धोका गर्भवतींना अधिक असल्याने रुग्ण आढळून आलेल्या परिसरातील गर्भवतींच्या तपासणीवर आरोग्य विभागाने भर दिला आहे.



खराडी परिसरातील ३२ व २५ वर्षे वयाच्या दोन गर्भवतींना झिकाचा संसर्ग झाला आहे. त्यातील एक २२ आठवडे आणि दुसरी १८ आठवड्यांची गर्भवती आहे. या दोघींच्याही अॅनोमली स्कॅन अहवाल चांगले आलेले आहेत. या दोघींना कोणतीही लक्षणे दिसून आली नाहीत. खराडी परिसरात आधी एक झिकाचा रुग्ण आढळून आला होता. त्यामुळे परिसरातील आठ गर्भवतींचे नमुने तपासणीसाठी राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत पाठविण्यात आले होते. त्यातील दोघींना झिकाचे संसर्ग झाल्याचे अहवाल महापालिकेच्या आरोग्य विभागाला गुरुवारी मिळाले.

शहरात आतापर्यंत झिकाचे एकूण १८ रुग्ण आढळले असून, सर्वाधिक ६ रुग्ण एरंडवणे परिसरात सापडले. त्याखालोखाल पाषाण आणि खराडी परिसरात प्रत्येकी ३ रुग्ण आढळले आहेत. मुंढव्यात २ तर डहाणूकर कॉलनी, उजवी भुसारी कॉलनी, आंबेगाव बुद्रुक आणि कळस परिसरात प्रत्येकी एक रुग्ण आढळला आहे. रुग्ण आढळून आलेल्या परिसरात आरोग्य विभागाकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू आहेत.

### ग्रामीण भागातही शिरकाव

» शहरात वेगवेगळ्या भागांत झिकाचे रुग्ण आढळून येत असताना आता ग्रामीण भागात झिकाचा शिरकाव झाला आहे. सासवडमध्ये एका ६५ वर्षीय पुरुषाला झिकाचा संसर्ग झाला आहे. त्याला २४ जूनपासून त्रास होऊ लागला. त्यामुळे त्याला सुरुवातीला स्थानिक रुग्णालयात आणि नंतर पुण्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या रुग्णाचा रक्तनमुना तपासणीसाठी २ जुलैला एनआयव्हीला पाठविण्यात आला. त्याचा तपासणी अहवाल ३ जुलैला मिळाला. या रुग्णाने गेल्या महिन्यातच मिरजला प्रवास केला होता. त्याच्या कुटुंबातील कोणामध्येही अद्याप झिकाची लक्षणे दिसून आलेली नाहीत.